# अभिवाचनात मुलांसोबत रमले पालक

मुलांचा चिवचिवाट... त्यांच्या चेहऱ्यावरील उत्सुकता... आणि समोर सुरू असलेल्या अभिवाचनात आपल्या मुलांसमवेत दंग झालेले पालक, असे चित्र 'वाचन कट्ट्या'वर नुकतेच पाहायला मिळाले.

'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस'ने हा 'वाचन कट्टा' आयोजित केला होता. अर्थात, आयोजनातही फक्त बच्चेकंपनीच सहभागी असणे, हे या कट्ट्याचे वैशिष्ट्य होते ! ईशान लिमये, श्रेयस दीक्षित, सर्वेश चक्रदेव आणि सई लिमये यांनी हा उपक्रम घडवून आणला.

पुस्तकांना आपले मित्र, सोबती, गुरू असे मानणाऱ्या या चौघांना मुलांसाठी काही उपक्रम करायचा होता. यांतील प्रत्येकाला वाचनाची भारी आवड. यातूनच 'आपण पुस्तकांचे अभिवाचन केले तर?' अशी अभिनव कल्पना त्यांच्या डोक्यांत आली अन् पाहता पाहता 'कट्टा' उभा झाला. 'प्रकाशवाटा', 'डायरी ऑफ द व्हिम्पी किड' अशी पुस्तके तसेच लहानग्यांची दिवाळी दाखविणारी 'अक्कू बक्कूची दिवाळी', ही इंदिरा संत यांची कविता निवडली. लहानग्यांमधील या 'मोठ्या' झालेल्यांच्या प्रयत्नाला दाद दिली ती रेणू गावस्कर यांनी. त्यांनी मुलांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

**गोष्टी ऐकणे ही वाचनाची सुरवात असते. त्यासाठी गोष्टी सांगणारे पालक तयार व्हायला हवेत. कारण नव्या युगात गोष्टी सांगितल्या तरच मुलांना वाचनात रुची निर्माण होईल.**

**रेणू गावस्कर**

ज्यांना एकही पुस्तक वाचायला मिळत नाही, अशा मुलांविषयी जाणीव मुलांमध्ये आणि पालकांमध्ये निर्माण होण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.